**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक 08.09.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**
**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 105** - अमरावती महानगरपालिका क्षेत्रात शहर बस वाहतुकीकरीता सर्व्हेक्षण करून प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी देणे व अमलबंजावणी करणेस प्रशासकिय मान्यता देणे बाबत.

**ठराव क्रमांक 105** - मा. केंद्र शासनाचे वतीने संपुर्ण भारतात ई-बस सेवा योजना कार्यान्वीत करीत असल्याबाबत दिनांक 26.08.2023 रोजी घोषणा केली आहे. त्याअनुषंगाने प्रधानमंत्री ई-बस सेवा योजना अंतर्गत अमरावती महानगरपालिकेचा समावेश करून अमरावती महानगरपालिका क्षेत्रात ई-बस सेवा सुरु करण्याकरीता संपुर्ण कार्यवाही करून प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक आहे. जेणेकरून आवश्यक बाबी पुर्ण केल्यानंतरच अमरावती शहराकरीता प्रधानमंत्री ई-बस सेवा योजना अंतर्गत शहर ई-बस सेवा वाहतुक सुरु होईल. अमरावती शहरामध्ये सद्यःस्थितीत BoT तत्वावर 25 शहर बसेसची सार्वजनिक परिवहन सेवा सुरु आहे. परंतु शहर बस सेवा ही अमरावती शहराच्या विस्ताराचा मानाने व चालु असलेली बसेस हया जुने तंत्रज्ञानावरचा असल्याने त्यात वारंवार बिघाड होत असल्याने सद्यस्थिती 15 बसेस शहरात सेवेकरीता सुरु आहे. ही व्यवस्था अपुरी असल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे. प्रधानमंत्री ई-बस सेवा सुरु झाल्यास नागरीकांना अतिशय माफक दरांमध्ये पर्यावरण पुरक सुविधा उपलब्ध होईल.

त्याअनुषंगाने प्रधानमंत्री ई-बस सेवा योजने अंतर्गत शासनाकडे प्रस्ताव दाखल करताना सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, ई-बस करिता चार्जिंग स्टेशन व डेपो करीता जागा निश्चित करणे, जागेबाबत दस्तऐवज मालमत्ता पत्रक, आरक्षण, महावितरण कंपनी मार्फत सदर ठिकाणी लागणारा वीज पुरवठा बाबत महानगरपालिका व महावितरण यांचा करारनामा करणे व इतर आवश्यक तदअनुषंगिक कामे पुर्ण करून प्रस्ताव शासनास सादर करणेकरीता संपुर्ण प्रशासकीय व वित्तीय अधिकार आयुक्त, अमरावती महानगरपालिका अमरावती यांना महानगरपालिकेचे प्रशासक म्हणुन प्रदान करण्यात येत आहेत. या अनुषंगाने सर्वसाधारणपणे 50 ई-बसेसचा सविस्तर प्रकल्प अहवाल कार्यशाळा मार्फत तयार करण्यात आलेला आहे.

सदर ठरावास मा.आयुक्त यांनी दि.०६/०९/२०२३ रोजी मान्यता प्रदान केली आहे.उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेचे मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे परंतु,सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास शासनास पाठविणे बाबत मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती

| | |
|---|---|
| **स्वा./-** | **स्वा./-** |
| **नगरसचिव** | **प्रशासक** |
| **महानगरपालिका, अमरावती** | **महानगरपालिका, अमरावती** |